
जगात गोष्टी कशा आल्या?



जगात गोष्टी कशा आल्या?

मराठी : अश्विनी बर्वे





अनानसे "द स्पाइडर-मॅन" च्या बाबत अनेक कहाण्या प्रचलित आहेत. ह्या कहाण्या आफ्रिकेतून आल्या, पण जगातील सगळी मुले त्यागोष्टी ऐकतात.
ही कहाणी त्यातलीच एक ”स्पाईडर-स्टोरी” आहे. ही कहाणी आपल्याला सांगते की, अनानंसेने पृथ्वीवरच्या मुलांसाठी आकाशातल्या देवाकडून काही कहाण्या कशा मागून आणल्या आणि मग या कहाण्यांचे नाव "स्पाइडर-स्टोरीज़" पडलं.



एक काळ असा होता की जेव्हा पृथ्वीवरच्या मुलांजवळ एकही गोष्ट नव्हती. आकाशातल्या देवाजवळ सगळ्या गोष्टी होत्या. तो त्या गोष्टी आपल्या घरात आकाशात, आपल्या खुर्चीवर ठेवत असे.

अनानसेला "स्पाइडर-मॅन" आकाशातल्या देवाकडच्या कहाण्याबद्दल माहीत होतं.

तो त्या कहाण्या पृथ्वीवरच्या मुलांसाठी आणू इच्छित होता.

“मला माहीत आहे मला काय करायचं आहे ते,” अनानसे म्हणाला. “मी आकाश-देवाला भेटायला जाईन आणि त्याला विचारेन की तो काही कहाण्या मला देवू शकेल का?”



अनानसेने मग एक कोळ्याचं जाळं विणलं आणि मग तो सरळ आकाशा पर्यंत गेला.त्यावर चढून तो आकाश देवाच्या घरी गेला.

आकाश-देव खूप मोठे होते. जेव्हा त्यांनी अनानसेला येतांना पाहिलं. तेव्हा त्याने विचारलं, तुला काय पाहिजे स्पाइडर-मॅन?"











अनानसेने आकाश-देववाकडे बघितलं. तो म्हणाला, “आकाश-देव, मला माहीत आहे तुमच्याकडे काही कहाण्या आहेत, आणि त्यातील काही मी पृथ्वीवरच्या मुलांसाठी घेवून जावू इच्छितो. तुम्हांला कहाण्यांच्या बदल्यात मी तुम्हांला काय देवू शकतो हे सांगा.”

आकाश-देव हसत अनानसे कडे बघितलं. “तू तर एक मजेशीर छोटा माणूस आहे,” ते म्हणाले.



“मी तुला नक्की सांगेन मला माझ्या कहाण्यांच्या बदल्यात काय पाहिजे ते, स्पाईडर मॅन,” आकाश देव म्हणाला. “मला भयानक दातांचा ओसेबो बिबट्या पाहिजे. आणि ममबोरो शिंगाची गांधीलमाशी पाहिजे, जिचे डंख आगीसारखा टोचतो. आणि एक अबोटीया परी पाहिजे जिला कोणी माणूस बघू शकणार नाही. हे सगळं जर तू मला देवू शकला तर पृथ्वीवरच्या मुलांसाठी मी काही कहाण्या तुला नेवू देईन.” असं म्हणत आकाश देव हसता हसता गडबडा लोळू लागले.








“हो," अनानसे म्हणाला, “महाराज, आपण जे सांगितलं तसं मी करेन.”


मग आकाश-देव अधिक हसले. “तुझ्यासारखा छोटा माणूस मला ह्या दुर्लभ गोष्टी कशा आणून देवू शकतो?” त्यांनी विचारले. “ओसेबा बिबट्या तुला खाऊन टाकेन, ममबोरो गांधीलमाशी तुला डंख मारेन, आणि अबोटीया परीला कोणी माणूस पाहू शकत नाही. तर मग तू तिला माझ्यासाठी कसं घेवून येवू शकतो.”

अनानसेने काही म्हटलं नाही, तो कोळ्याच्या जाळ्याच्या साह्याने खाली पृथ्वीवर आला. तो भयानक दातांच्या बिबट्याचा शोध घेवू लागला, ममबोरो गांधीलमाशी आणि अबोटीया परी जिला कोणी माणूस बघू शकत नाही यांचा शोध घेवू लागला.

“मी त्यांना घेवून येईन,” तो म्हणाला. “मला माहीत आहे, की मी हे काम करू शकतो.”







आधी अनानसे भयानक दांतांचा बिबट्या बघायला गेला. तो एका झाडाजवळ बसलेला त्याने पाहिला.


“तू माझं रात्रीचं जेवण म्हणून आला आहेस का स्पाईडर मॅन,” ओसेबाने विचारलं.

“आपण त्याबाबतीत नंतर बोलू,” अनानसे म्हणाला. “आधी मी तुझ्याबरोबर एक खेळ खेळू इच्छितो,”

ओसेबोला खेळ खेळायला आवडत होते. “तुला कोणता खेळ खेळायचा आहे?” त्याने विचारले.

“हा खेळ आहे,” अनानसे म्हणाला. “आधी मी तुझे पाय बांधेन. मग तुला सोडून देईन. त्यानंतर तू मला बांध आणि सोडून दे.”

“हा तर मोठा मज़ेदार खेळ आहे, " ओसेबो म्हणाला. त्याला अनानसेला बांधून खायचं होतं. पण अनानसेने ओसेबोला आधी बांधलं होतं. मग बिबट्याला एका झाडाला बांधून ठेवलं.



“लवकरच मी तुला आकाश-देवाला भेटायला घेवून जाईन,” अनानसे म्हणाला. “पण आधी मला आगी सारखा डंख मारणारी गांधीलमाशी माशी शोधून काढायची आहे. तू इथून पळून जावू नको,” मग तो झाडाला बांधलेल्या बिबट्याकडे पाहून हसला.



अनानसे तिथून पुढे गेला. लवकरच तो एका केळ्याच्या झाडाजवळ जावून पोहचला.

त्याने झाडाचे मोठे पान तोडले, “या पानाची मला मदत होईल,” तो म्हणाला. मग त्याला एक वाळलेला भोपळा मिळाला. त्याने त्याला एक भोक पाडले आणि त्यात थोडं पाणी टाकलं.

“आता मी त्या ममबोरो गांधीलमाशीचा शोध घेतो, ज्यांचा डंख जोरात टोचतो,” तो म्हणाला.







अनानसे पुढे गेला. लवकरच त्याला ममबोरो गांधीलमाशीचे पोळे दिसले. स्वतःला वाचवण्यासाठी त्याने केळ्याचे पान आपल्या डोक्यावर घेतले. मग त्याने केळ्याच्या पानावर भोपळ्यातले पाणी शिंपडले. त्यामुळे असं वाटू लागलं की पाऊस पडतोय.




अनानसेने बाकी पाणी ममबोरो गांधीलमाश्या वर टाकले. मग तो ओरडला, “पाऊस पडतोय, पाऊस पडतोय.”

“पाऊसा पासून वाचण्यासाठी लवकर माझ्याकडच्या भोपळ्या च्या छोट्या छिद्रातून आत जा, गांधीलमाशानो.”

"धन्यवाद, अनानसे," गांधीलमाशा म्हणाल्या. आणि पाऊसा पासून वाचण्यासाठी त्या एकामागून एक भोपळ्यात शिरल्या.





अनानसे म्हणाला, “आता मला एवढंच करायचं आहे की, या माश्या भोपळ्यातच राहतील.”

मग त्याने भोपळ्याला झाडावर टांगलं.

“लवकरच मी तुम्हांला आकाश-देवाला भेटायला घेवून जाईन,” अनानसे म्हणाला. “पण त्या आधी मला अबोटीया परीला शोधायचं आहे, जिला कोणी माणूस बघू शकत नाही.”



अनानसेने एक छोटी बाहुली तयार केली. जिच्या हातात एक भांडं दिलं, त्याने बाहुलीला चारी बाजूला डिंक लावला, आणि मग त्याने त्या भांड्यात काही कंद ठेवले..





मग त्याने एक पातळ वेल घेतला आणि एक टोक बाहुलीच्या डोक्याला चिटकवले, मग त्याने बाहुलीला एका झाडाखाली लाल फुलांच्या मध्ये ठेवलं. कारण पऱ्यांना तिथं खेळायला आवडतं..

अनानसेने वेलीचं दुसरं टोक आपल्या हातात घेतलं आणि मागे जाऊन तो लपून बसला.

लवकरच अबोटिया परी जिला कोणी माणूस बघू शकत नाही ती लाल फुलांबरोबर खेळायला खाली आली.
तिने बाहुलीला झाडाखाली बसलेलं पाहिलं. बाहुलीच्या हातातल्या भांड्यात काय आहे हे बघायला परी थांबली.



जेव्हा अबोटियाने भांड्यात कंद बघितले तेव्हा तिच्या तोंडाला पाणी सुटले. तिला कंद खूप आवडत.



"कृपया मला काही कंद दे," अबोटिया बाहुलीला म्हणाली.



अनानसेने वेल खेचला आणि बाहुलीचे डोकं खाली-वर होवू लागलं. असं वाटत होतं, की बाहुली 'हो' म्हणते आहे.

अबोटियाने काही कंद घेतले आणि आपल्या तोंडात टाकले. "किती छान आहेत!" अबोटियाने अजून काही कंद घेतले.



लवकरच अबोटियाने सगळे कंद खाल्ले.
“आभारी आहे,“ ती बाहुलीला म्हणाली.
पण बाहुलीने काहीच उत्तर दिले नाही.


“आभारी आहे," परत अबोटिया म्हणाली. तरीपण बाहुली काहीच म्हणाली नाही. अबोटियाला राग आला.

“माझ्याशी बोल!” ती ओरडून म्हणाली.
पण बाहुलीने काहीच उत्तर दिले नाही.






“माझ्याशी बोल, माझ्याशी बोल, नाहीतर मी एक चापट ठेवून देईन,” अबोटिया ओरडली. पण बाहुली काहीच म्हणाली नाही.



मग अबोटियाने बाहुलीला एक चापट मारली. तुम्हांला माहीत आहे का? त्या चापटीने काय झालं. परीचा हात डिंकाला चिकटला. जो अनानसेने बाहुलीवर लावला होता.






अबोटियाला अजून राग आला. “माझा हात सोड, नाहीतर मी अजून दुसऱ्या हाताने तुला थप्पड मारेन,” ती रागाने म्हणाली.

पण बाहुलीने परीचा हात सोडला नाही, म्हणून अबोटियाने तिला अजून एक थप्पड़ मारली. आता तिचा दुसरा हात पण डिंकाला चिकटला.

आता अबोटिया एवढी चिडली जेवढी एखादी परी होवू शकते.तिने बाहुलीला आपल्या पायाने मारलं.तेव्हा तिचे पाय पण डिंकाला चिकटले. आता तिचे दोन्ही हात आणि दोन्ही पाय चिकटून गेले. आता परी फारच मजेदार दिसत होती.




अनानसेने आपल्या लपण्याच्या जागेवरून पाहिलं. त्याने बघितलं परी आता पूर्ण फसली होती.



अनानसे परीकडे बघून हसला. “आता तुला आकाश-देवाला भेटायला घेवून जातो,” तो म्हणाला. ”पण त्याआधी मला इतर दुसऱ्या गोष्टी सुद्धा बरोबर घेवून जायच्या आहेत. त्या घेतो.”




मग अनानसे, अबोटिया परीला घेवून झाडाच्या त्या ठिकाणी आला जिथे त्याने बिबट्याला बांधून ठेवले होते आणि गांधीलमाशांना टांगून ठेवले होते. मग त्याने कोळ्याचे जाळं विणलं आणि तो सरळ वर आकाशात गेला.





अनानसेने ओसेबो बिबट्याला, ममबोरो गांधीलमाशांना आणि अबोटिया परीला जाळ्यातून सरळ आकाशात खेचलं. मग त्याने सगळ्यांना आकाश-देवाच्या पायी ठेवलं.

अनानसे म्हणाला, “या घ्या सगळ्या गोष्टी ज्या तुम्ही मागितल्या होत्या. आता तुम्ही मला पृथ्वीवरच्या मुलांसाठी काही कहाण्या द्याल का?”



आकाश-देवाने ओसेबो बिबट्या, ममबोरो गांधीलमाशांना आणि अबोटिया परीला पाहिलं. मग त्याने त्या छोट्या अनानसे स्पाइडर-मॅनकडे बघितलं.

“हो, अनानसे," आकाश-देव म्हणाले.
“तू त्या सगळ्या गोष्टी आणल्या आहेत, ज्या मी मागितल्या होत्या. आता मी तुला माझ्याजवळच्या सगळ्या कहाण्या देईन. आता त्या गोष्टी "स्पाइडर-स्टोरीज" म्हणून ओळखल्या जातील.”



कहाण्या मिळाल्याने अनानसे खूप प्रसन्न झाला. तो त्या गोष्टी घेवून पृथ्वीवरच्या मुलांकडे आला.

आता जगभरातील मुलं अनानसे-द-स्पाइडर-मॅन आणि त्याचे कारनामे याबद्दल जाणून आहेत.

समाप्त



